# 👧 लेक लाडकी योजना (मुलींसाठी प्रोत्साहनपर योजना)

## 🎯 उद्दिष्टे:

1. मुलींचे जन्म प्रमाण वाढवणे
2. शिक्षणास चालना देणे
3. बालविवाह रोखणे
4. कुपोषण कमी करणे
5. शाळाबाह्य मुलींचे प्रमाण 0 वर आणणे

---

## 💰 लाभाचे स्वरूप (एकूण ₹1,01,000/-):

| टप्पा | लाभ (₹) | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| मुलीचा जन्म | ₹5000 | जन्म प्रमाणपत्र, विशिष्ट महिन्यात जन्मलेली मुलगी |
| इ.1ली मध्ये प्रवेश घेतल्यावर | ₹6000 | आधारकार्ड, शाळेचा दाखला |
| इ.6वी मध्ये प्रवेश घेतल्यावर | ₹7000 | शाळेचा दाखला |
| इ.11वी मध्ये प्रवेश घेतल्यावर | ₹8000 | शाळेचा दाखला |
| 18 वर्ष पूर्ण केल्यावर (अविवाहित असल्यास) | ₹75,000 | स्वघोषणा, मतदार यादीत नाव, ओळखपत्र |

## 📌 अटी व शर्ती:

- 1 एप्रिल 2023 नंतर जन्मलेली मुलगी
- कुटुंबाकडे पिवळे/केशरी रेशनकार्ड आवश्यक
- वार्षिक उत्पन्न ₹1 लाखाच्या आत
- लाभार्थिनी अविवाहित असावी
- कुटुंब नियोजनाचे प्रमाणपत्र आवश्यक
- फक्त एक किंवा दोन मुलींना लागू

---

## 📋 आवश्यक कागदपत्रे:

1. मुलीचा जन्म दाखला
2. उत्पन्नाचा दाखला (तहसीलदाराकडून)
3. आधार कार्ड (मुलगी व पालकांचे)
4. शाळेचा बोनाफाईड दाखला
5. संयुक्त बँक खाते (मुलगी व आईचे)
6. रेशनकार्ड
7. मतदार यादीत नाव (18व्या वर्षी)
8. कुटुंब नियोजन प्रमाणपत्र
9. अविवाहित असल्याची स्वघोषणा

---

## □ प्रस्ताव सादर करण्याची पद्धत:

- जवळच्या **अंगणवाडी केंद्रात** जाऊन आवश्यक कागदपत्रांसह **ऑनलाइन/ऑफलाइन** अर्ज करावा.

## 💳 लाभ कसा मिळेल?

- लाभाची रक्कम **DBT (Direct Benefit Transfer)** द्वारे मुलगी व आईच्या **संयुक्त खात्यात** जमा केली जाईल.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना, (जिल्हा स्तर), महिला व बाल विकास विभाग,**

**जिल्हा परिषद, लातूर.**

1. मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण.
2. महिलांसाठी समुपदेशन केंद्र.
3. इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण.
4. आदर्श अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षक यांना पुरस्कार देणे.
5. अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण.

---

## वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठीचे निकष / अटी व शर्ती:

1. मान्यता प्राप्त संस्थेमार्फत प्रस्ताव सादर करणाऱ्या यांना. (प्रशिक्षण)
2. किमान-किमान 07 वी पास प्रशिक्षण लाभ घेणाऱ्या यांना. (प्रशिक्षण)
3. नांदेड जिल्ह्याची रहिवासी असावी. (रा.शे. प्रमाणपत्र)
4. कुटुंबाचे मागील वर्षाचे उत्पन्न रुपये ₹1,20,000/- च्या आत असावे.
5. यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

---

## 1. अंगणवाडींना विविध साहित्य पुरवठा:

**सदर साहित्यामध्ये शैक्षणिक व बौद्धिक विकासाला चालना देणारी विविध प्रकारची खेळणी,** शारीरिक विकासासाठी आवश्यक खेळणे साहित्य, शैक्षणिक तक्ते, चाईल्ड ट्रॅकिंग सॉफ्टवेअर, श्रेठ वजनकाटे, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, इन्फ्रारेड स्टेडिओमीटर, जलशुद्धीकरण यंत्र टेबल खुर्ची, कपाटे, चप्पल स्टँड, स्टील डिशेस, चमचे, ग्लास, सतरंजी, बॅग्जपट्या,
डिजिटल घड्याळ, संगणक, अंगणवाडीतील मुले/मुलींना गणवेश वाटप इ. साहित्य पुरवठा होईल.

## 02. कुपोषित मुलामुलींसाठी व किशोरवयीन मुलींसाठी गरोदर स्तनदा माता यांना अतिरिक्त आहार:

ग्रामीण भागातील अंगणवाडीचे कार्यक्षेत्रातील **6 महिने ते 3 वर्षे** व **3 वर्षे ते 6 वर्षे** वयोगटातील मुलामुलींना अंगणवाडीतून मोफत आहार दिला जातो.

या व्यतिरिक्त कुपोषित मुलांचे कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी **विशेष आहार** स्वरूप प्रोटीन सिरप, प्रोटीन पावडर, मायक्रोन्युट्रियंट्स सप्लिमेंटेशन सिरपचा, मिनरल व्हिटॅमिन्सचा पुरवठा करण्यात यावा.

तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार **दूध, सोयादूध, चिक्की, लाडू, अंडी, गूळ शेंगदाणे** इत्यादी पौष्टिक व प्रथिनयुक्त आहार तसेच गरोदर स्तनदा माता व किशोरी मुलींना **लोखंडाच्या गोळ्या** देणे आवश्यक.

किशोरवयीन **मुलींच्या 13 ते 19 वयोगटातील दारिद्र्य रेषेखालील शाळेच्या / शाळाबाह्य** मुलींना आवश्यक अशा **आरोग्यविषयक साहित्याचे मोफत वाटप** करण्यात यावे.
(उदा. सॅनिटरी नॅपकिन इ.)